

# कामाचा हक्क आणि बेकारी हे कोडं सुटायचं कसं !

टॅं हॅं SSS टॅं हॅं SSS सोनाच्या सहा महिन्याच्या मुलाने कळवळून टाहो फोडला. तंबाखूच्या खकाण्याने त्याला खोकल्याची उबळ आली. एवढासा जीव पार गुदमरून गेला. हातातले काम टाकून सोनाने झोळीतच पोराची टाळू फुंकली व त्याला शांत केले. खकाण्याला सरावलेल्या त्या जीवाने पण आईची लवकर सुटका केली. ४–८ आणे मजूरीत खोट नको ! झोळीची दोरी पायात धरून सोना पोराला झोके देत विड्या वळू लागली. पत्र्याच्या शेडमध्ये घामाच्या धारा गाळीत ८–८ तास मान मोडून काम करायचे पण मजूरी ? निरनिराळ्या मिषाने कापाकापी करून ३ ते ४ रु. सुटणे मुष्किल; १०–१२ वर्ष काम केलं की हमखास क्षयाची बाधा ! आरोग्य, स्वच्छता, हवेशीर जागा हे सर्व कायद्याच्या बुकात. प्रत्यक्षात जनवारांचे गोठे बरे !

तर ही सोना काय, शेतमजूरी करणाऱ्या राधा, पारू काय आणि अशाच पिळवणूक, गांजणूक होणाऱ्या व्यवसायातील बायांना हे का सहन करावे लागते ? एरवी त्यांना आराम मिळतो म्हणून काम हवे काय ? मुळीच नाही. घरकामाला तर त्या १२–१२ तास बांधलेल्याच आहेत. पण त्या कामातून काय पोट भरणार आहे ? घरातील पुरुषाच्या मिळकतीत भागेना म्हणून कामाची दुसरी पगारी पाळी करायला त्या बाहेर पडल्या आहेत. पूर्वी घराघरात, शेतात आपल्या पुरुषा-बरोबर बाया पोटाचा व्यवसाय करत होत्या. शेकडो स्त्रिया आपल्या छोट्या शेतावर काम करत होत्या. शिवाय लोहार, चांभार, सुतार, विणकर, अशा अनेक व्यवसायी पुरुषांबरोबर त्या भागिदारी करीत होत्या. पण आता जगण्याच्या कामांची नी घराची फारकत झाली आहे. उद्योगधंदे वाढू लागले आणि जगण्याची साधने मूठभरांकडे गोळा झाली. कामाच्या मागणीसाठी बाया–पुरुष दोघांनाही बाहेर पडावे लागते.

## काम द्या ! ! !

कष्ट करायचे– काम करायचे ही तर माणसाची जीवन–धारणा. असे असताना "आम्हाला काम द्या." "आम्हाला श्रम करू द्या." अशी मागणी आपल्याला करावी लागते. जणू काम करण्याची परवानगी देणारे कोणीतरी वेगळे आहेत. त्यांच्या हुकुमाशिवाय सभोवार दिसणाऱ्या, आवश्यक असणाऱ्या कामाला आपण हात लावू शकत नाही. असे का ? कारण माणसाच्या सुखा-साठी, समृद्धीसाठी समाजात जी साधन–सामुग्री आहे त्यावर काही मूठभरांची मालकी आहे.

त्या साधनांचा वापर करून संपत्तीची निर्मिती लाखो कष्टकरी करतात. परंतु सर्वांना रोजगार पुरवून त्यांच्या श्रमाचा योग्य वापर करणे, त्या श्रमातून सर्व जनतेसाठी आवश्यक ते उत्पादन करणे आणि त्याचे

आजपर्यंत दारू पिऊन मारणाऱ्या पुरुषाकडे "नवराबायकोच्या भांडणात जा कशाला ?" अशा विचाराने दुर्लक्ष केले जाई. आता त्या विचार करू लागल्या आहेत की, मारहाण करणं हे माणुसकीचं लक्षण नाही. त्या मार खाणारणीला संरक्षण द्यायला पाहिजे. आता त्या अशा झगड्यात लक्ष घालतात व अशा पुरूषांना फैलावर घेतात.

तर अशा या संघटनेत एकदा सावित्रीबाईंनी काढलेल्या पहिल्या शाळेची माहिती दिली गेली. १५० वर्षे होऊन गेली तरी शिक्षणाचे बाबतीत आम्ही मागेच आहोत. तेव्हा हा "मुलींच्या पहिल्या शाळेचा दिन" साजरा करण्याचे ठरले. तेथील मुलींनी स्वतः होऊन उत्साहाने गाणी, नाच बसवायला सुरवात केली आहे. काही कॉलेज विद्यार्थी–विद्यार्थिनी त्यांच्या जीवनावर छोटी नाटिका करणार आहेत. त्याचदिवशी १००–१२५ मुले–मुली शाळेत नावे घालणार आहेत.

तेथे चालविल्या जाणाऱ्या साक्षरता वर्गात त्यादिवशी आणखी प्रौढ भगिनींची नावे नोंदवली जाणार आहेत.

**–एक सहाय्यक कार्यकर्ती**

(पान ३१ वरून)

मित्रहो, आपण म्हणाल एवढा लिहिण्याचा उपद्व्याप कशासाठी? पण त्याची गरज वाटते. या देशातील समाजव्यवस्था आणि समाजव्यवस्थेला शाबूत ठेवणारा, प्रस्थापित फुलाजी, त्याचा मुलगा आणि त्याचे गब्बर साथीदार यांनी सोनबाच्या ९ ते १० वर्षांच्या भावाला जिवे मारण्याचा घाट घातला.

सोनबा व घरातील सर्व लहान मुले मजूरी करीत. त्यांचा ९ ते १० वर्षाचा एक भाऊ (की आत्तापर्यंत ज्याच्या साक्षीवर ज्याची तारण जमीन परत मिळत आहे) हा एका माळ्याकडे रु. २७५–रुपयावर सालाने सालदार म्हणून काम करीत होता. २० जुलै ७७ रोजी एक अज्ञात इसम, सायंकाळी तो मालकाच्या शेतातील काम अटोपून येताच निरोप देतो, 'तुला तुझ्या भावाने घरी बोलावले आहे.' अंगावर फाटकी शाल, त्यात मालकाचे घरून घेतलेली थोडीसी भाकरी रस्त्याने जात जात खाऊ व ओढ्यावर पाणी पिऊ या विचाराने तो निघाला.

"मी २ ते ३ मैल अंतर कापले होते, तेवढ्यात काही माणसे जोरात पळत आली आणि मला 'थांब साल्या' म्हणून मोठ्याने आवाज आला. भीती वाटल्याने मी पुढेच पळत होतो. एवढ्यात मोठा दगड माझ्या डोक्यात बसला व लगेच मी खाली पडलो. ती दोन माणसे माझ्या जवळ आली. मला लाथा बुक्यांनी मारू लागली, मी उठून बसलो तर मला पुन्हा त्यांनी खाली पाडले, दगडांनी माझे डोके ठेचत होते, माझी शुद्ध हरवली. 'थांब भडव्या आता तुला जिवंत सोडत नाही, तूच जबाब देतोस का? तू एकदा मेला की मग पाहतो बाकीच्यांचे असे बोलत होते" मुलगा हकीगत सांगत होता. मुलाचा अर्धा कान तुटला होता, डोळ्यात अद्याप रक्त उतरलेली लाली होती. सगळे डोके हिदहिद झालेले होते. डॉक्टरांनी किमान ७-८ ठिकाणी नुसत्या डोक्याला टाके मारल्याचे दिसत होते.

सोनबा म्हणतो "सरकार दरबारी जरी आम्हास न्याय मिळाला तरी आमच्यापैकी कुण्या भावाचे कोणत्या वेळा काय होईल ते सांगता येत नाही. या पूर्वी आम्ही अनेकवेळा पोलीसाकडे तक्रारी केल्या, पोलीस तक्रार नोंदवून तर घेत नाहीच उलट आम्हालाच कोंडून ठाण्यात मारतात. एकवेळ तर गावात घरीच कोंडून मारले, गावातले ९० टक्के लोक शेतमजूर युनियनचे सभासद आहेत. त्यात आदिवासी आहेत, कुठेही चोरी झाली तर प्रथम आमच्या गावातल्या लोकांना पोलीस मरेपर्यंत मारतात."

पोलीसांनी जबाब घेतला असला तरी अद्याप कुणासही अटक केली गेली नाही. सोनबा व त्याच्या घरातील मुले म्हणतात आमच्या जमिनीचे काय व्हायचे ते होऊ दे पण आमच्या जिवाशी खेळ कशासाठी? अशा लहान लहान मुलांनी काय बिघडवले. गावात फुलाजीच्या घरासमोरून जात असताना ६ महिन्यापूर्वी ४ वर्षाच्या भावाला त्याच्या मुलांनी काही कारण नसताना बेदम मारले होते, पोलीसाकडे तक्रार नेली तर त्यालाच खाकीचा "हिसका" बसला.

ह्या लहान लहान बालकांचे जीवन धोक्यात आहे, जिवंत राहाण्याची हमी नाही, पोलीसाच्या मदतीने फुलाजी काहीही करु शकतो असा गावात समज झाला आहे. शेतमजूर कार्यकर्त्यांनी त्या विभागातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन या विरुद्ध आवाज उठविण्याचा निर्णय घेतला आहे.

**–एन. टी. चौधरी**

न्याय्य वाटप करणे, याची सूत्रे कष्टकऱ्यांकडे नसतात, तर श्रम विकत घेणाऱ्या मालकांकडे असतात. अशा परिस्थितीत कामाची मागणी करत रहाण्यापलिकडे आपल्या हातात आहेच काय ?

## बेकारीचा फास !

धान्य, कपडा, बैल, इंजीन, पंप, यंत्रे याची जशी आज बाजारपेठ आहे, तशीच श्रम विकणाऱ्या मजूर स्त्री–पुरुषांचीही बाजारपेठच असते. मालक मंडळींना जरूर नसेल, परवडत नसेल तर ते या बाजारपेठेतील श्रमिकांना धुडकावून लावू शकतात– नव्हे लावतात. साध्या, टिकाऊ कापडात नफा होत नाही, म्हणून गिरण्याचे मालक गिरण्या बंद पाडतात आणि कामगारांना देशोधडीला लावतात.

अन्न, वस्त्र, निवारा, करमणूक, शिक्षण यासाठी लाखो लोक आसुसलेले आहेत आणि आमचे हे बाजारपेठेतले श्रमिक सबंध समाजासाठी ही संपत्ती तयार करायला तयार आहेत. पण नफ्यावर डोळा ठेवणारे– गिरण्या, कारखाने, मोठे जमीन मालक म्हणतात, "कमी माणसात जास्त काम व त्यामुळे जास्त नफा देणारी यंत्रे आम्ही आणली आहेत. सर्वांना काम देणे परवडत नाही. ज्यात फार नफा सुटत नाही अशा सर्व समाजाच्या गरजा भागवणेही परवडत नाही." याच्या परिणामी बेकारीने हजारो स्त्री–पुरुषांच्या जीवनाची विघळवाट होते. निरनिराळ्या कारणाने ही बेकारी लादली जाते.

## बाईने "चूल व मूल" करावे

हा बेकारीचा काच तर स्त्रियांना किती जाणवतो हे आपण हरघडी अनुभवतो. जास्तीत जास्त स्वस्तात श्रमशक्ती मिळवून नफा जास्त काढणे हा तर आजच्या भांडवलशाहीचा नियम आहे. त्यासाठी ते कोणत्या परिस्थितीत कोणत्या विभागाचे श्रम स्वस्तात लुबाडता येतील याचा फार बारकाईने अभ्यास करतात. बाई जेव्हा परिस्थितीने कामासाठी बाहेर पडते, तेव्हा साहाजिकच तिला पुरुषापेक्षा कमी मजूरी दिली जाते. एकतर तिलाही वाटते, "आपण बाईमाणूस, बिनमोलाचं घरात राबतो. बाहेर निदान थोडेतरी मोल मिळतील." म्हणून, तीही या अन्यायाविरुद्ध तडकून उठत नाही, आणि समाजाचा तिच्याविषयीचा जुना विचार हाही एक अडथळा. मालक या गोष्टीचा पूर्ण फायदा उठवतात. मागासलेपणाचा, असंघटितपणाचा फायदा घेऊन सर्व कायद्याचे संरक्षण हिरावले जाते, व बायांची पिळवणूक होते. आपल्या देशाच्या आजच्या खुरटलेल्या परावलंबी अर्थव्यवस्थेत बेकारीचा काळ येतो तेव्हा बायांनाच प्रथम बाहेरचा रस्ता दाखवला जातो.

## बायांना कामे कोणती मिळतात ?

स्वातंत्र्यपूर्व काळात बायांचे स्वस्त, बिनकसबी श्रम वापरले जात. खाण, कापडधंदा, चहामळे या उद्योगात शेकडो बाया काम करत होत्या. यंत्रे सुधारू लागली, कामगार हक्कासाठी जागृत होऊ लागले, कामाची परिस्थिती, वेतन, महागाई, कायद्याचे संरक्षण यासाठी झगडे देऊन ते मिळविले. परंतु परकीयांच्या गुलामी मुळे उद्योगधंदे झपाट्याने वाढत नव्हते. या सर्वांचा परिणाम म्हणजे बेकारीचा हल्ला बिनकसबी श्रमिक स्त्रियावर झाला. हजारो स्त्रिया खाण व कापड व्यवसायाला मुकल्या. तेव्हापासून ते आतापर्यंत बिनकसबाचे, कमी पगाराचे, कायद्यांचे सरंक्षण नसलेले व्यवसायच बहुसंख्य स्त्रियांना करावे लागताहेत. काही तरी शिक्षण, कसब असलेली कामे, डॉक्टर, वकील, इंजिनिअर वगैरे बुद्धीजिवी व्यावसाय यात तर फारच थोडा वाव होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर रोजगारांचे, नोकऱ्यांचे क्षेत्र वाढले पण ते सुद्धा स्त्रियांच्या घरातील कामाशी व भूमिकाशी संबंधीत व्यावसायातच ! नर्स, शिक्षिका, सेक्रेटरी, रिसेप्शनिस्ट, मॉडेल गर्ल, टायपिस्ट वगैरे. याही क्षेत्रात एकून स्त्री लोकसंख्येच्या मानाने फारच थोड्या स्त्रियांना कामे मिळाली. आपल्या शेतीप्रधान देशात लोकसंख्या ग्रामीण भागात जास्त आहे. तेथेही पुरुषाप्रमाणे, ज्या स्त्रियांना रोजगार मिळतो तोही हंगामीच. शिवाय मजुरी कमी, समान व किमान वेतन मिळत नाही.

## देश स्वतंत्र झाला तरी रोजगार का वाढत नाही ?

१९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. ब्रिटिशांनी देश सोडला तेव्हा आपली स्थिती कशी होती ? आप-

लीच नव्हे तर जगाच्या पाठीवरील सर्व गुलाम देशांची या पुढारलेल्या औद्योगिक देशांनी सर्व बाजूनी लूट केली होती. साधनसंपत्तीची लूट, माणसांच्या श्रमाची लूट! राजकीय, आर्थिक सत्तेच्या जोरावर एवढ्या मोठ्या अफाट देशास त्यांनी मागास ठेवले. शेतीचा विकास झाला नाही. उद्योगधंदे झपाट्याने वाढू दिले नाहीत परिणामी आम्ही दारिद्री, अज्ञानी, मागास राहिलो.

## सामान्यांचे जीवन कधी सुधारणार ?

देशाच्या विकासासाठी संपत्तीसंचय लागतो. परकीयांनी त्याची साठवणूक रोखली होती. स्वातंत्र्यासाठी लढलेली जनता स्वतःच्या आणि जगभरच्या जनतेच्या अनुभवातून शिकली होती. भांडवल संचयासाठी जुन्या पद्धतीने अमानुष, रानटी पद्धतीने पिळवणूक करून घेऊन देशाचा विकास म्हणजे मूठभर भांडवलदार, मक्तेदारी व्यापारी, जमीनदार सधनांचा विकास तिला नको होता. जगभर कितीतरी देशांनी अनिर्बंध भांडवलशाही पद्धत झुगारून दिली होती कारण तिची प्रगतिची मर्यादा संपली आहे. तेव्हा स्वतंत्र झालेल्या पण मागासलेल्या देशापुढे आपल्या विकासाचे दोन मार्ग होते. एक स्वावलंबीपणाने, सहकारी पद्धतीने देशातील प्रचंड मनुष्यबळाचा व साधन संपत्तीचा वापर करून खुषीच्या श्रमाने वरकड संपत्ती निर्माण करून औद्योगिकरण करण्याचा. दुसरा मार्ग परकीयांकडून कर्ज, तंत्र घेण्याचा म्हणजेच परावलंबित्वाचा. इतर अनेक स्वातंत्र देशातील भांडवली विचाराच्या राज्यकर्त्यांप्रमाणे आमच्या देशातील राज्यकर्त्यांनी तोच मार्ग अनुसरला. पण त्यामुळे बेकारी दारिद्रय, विकास हे प्रश्न सुटले काय? धनकोंची भांडवली व्यवस्था अरिष्टात होती तर ऋणकोंचे प्रश्न सुटणार कसे? उलट ऋणकोंचा वापर करून ते आपलीच सावरासावर करणार. तसेच झाले. व्याजापोटी हप्त्यांपोटी, परकीयांचे भांडवलावरील नफ्यापोटी आमची लूटच झाली व होते आहे. संपत्ती संचय दूरच. अशा परिस्थितीत रोजगार वाढणार कसा ?

पुरुषांनाच पुरेसा रोजगार नाही तिथे बायांना कसा मिळणार? परंतू आज बायापुरुष दोघांनाही रोजगाराची निकड आहे. त्याशिवाय कुटुंबाचा निर्वाह होत नाही. स्वातंत्र्य चळवळीत जनतेच्या दडपणाखाली मान्य झालेली 'विषमता दारिद्रय नष्ट करणे, सर्वांना रोजगार मिळणे, सर्व कष्टकारी जनतेचे जीवनमान उंचावणे' ही उद्दीष्टे कागदावरतीच राहीली आहेत. जो काही थोडा विकास झाला त्याची फळे कष्टकऱ्यांच्या हाती लागली नाहीत. ती काही मूठभरांनी हस्तगत केली. तेव्हा आपण स्त्रियांनी रोजगाराच्या प्रश्नाच खोलीने विचार करून समाजपरिवर्तनाच्या प्रयत्नात भागीदारी केली पाहिजे.

## उत्पादनातील भागिदारीशिवाय विकास अशक्य

केवळ जगण्यासाठीच नव्हेतर आपले चार भिंतीतील अज्ञानी, संकुचीत जीवन बदलण्यासाठी समाजाच्या उत्पादनात, समाजबांधणीत भाग घेतला पाहिजे. त्याशिवाय आपल्यात तयार झालेला दुबळेपणा, भित्रेपणा, पुढाकार घेण्यातील उदासीनता संपणार नाही. नोकरीसाठी बाहेर पडलेली मिळवती बाई नवीन जाणीवा घेते. परंतु आज तिच्या मार्गात अडथळेही आहेत. मिळवती झाली म्हणून तिची स्त्री म्हणून जी घरातील सर्व कामे आहेत ती तिलाच करावी लागता. त्यामुळे तिच्यावर ताण पडतो. तिला आपल्या कामातील कसब हस्तगत करण्याची किंवा स्वतःचा विकास करण्याचे त्राण रहात नाही. समाजकारण, राजकारण, युनियन संघटना– वगैरे बाबतीतही तिला भाग घेणे कठीण जाते. त्यांच्या कुवतीचा वापर करण्याची परिस्थितीही अजून तयार नसल्याकारणाने तिच्यावरील स्त्री म्हणून पडणाऱ्या जबाबदाऱ्यांचे सामाजीकरण होत नाही असे हे दुष्ट चक्र आहे. परंतु निकडीतून जशा जाणीवा वाढतात तसे आपण संघटित प्रयत्न करणे जरूर आहे. खालील मागण्या घेऊन आपण सुरवात करू या.

१) प्रत्येक बाईला काम मिळालेच पाहिजे.

२) उत्पादनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रियांना प्रवेश असावा.

३) ग्रामीण व शहरी भागात स्त्रियांसाठी तांत्रिक शिक्षणाची सोय वसतीग्रहांसह झाली पाहिजे.

४) समान कामाला समान वेतन मिळालेच पाहिजे.

– लीला भोसले

पान ८ वरून,

वास्तविक चित्रपट, वृत्तपत्रे, मासिके ही सारी लोक-शिक्षणाची माध्यमे. ज्यायोगे समाजाला प्राप्तपरिस्थीतीची जाणीव करून देऊन प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी योग्य दिशा दाखविणे शक्य असते. याउलट आपलीच तुंबडी भरणारे मोजके लोक व्यक्तीगत फायद्यासाठी याचा आपल्या सोयीनुसार हवा तसा वापर करीत असतात. समाजाला जागृत करण्याऐवजी ते विकृतीच फैलावत असतात. आणि अशाच लोकांना पूरक असणारे सरकारही याची दखल घेत नाही. पण केवळ करमणूक म्हणून सामान्यपणे आपणही याकडे दुर्लक्ष करीत असतो. आणि मग भांडवलदार वर्ग त्याचा पुरेपूर फायदा उठवतात.

तेव्हा आपण गप्प बसून, केवळ बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही. स्त्रीला एक बाजारीवस्तु, भोगदासी बनविणाऱ्यांचा कडाडून निषेध व्यक्त केला पाहिजे. स्त्री मधील इतर कोणतेही गुण लक्षात न घेता कलेच्या नावाखाली स्त्रीच्या शरीर सौंदर्याचा सौदा हे समीकरण उधळून लावलं पाहिजे. या विचारानेच आम्ही पुढे झालो आणि निदर्शने करून आमची तीव्र प्रतिक्रीया नोंदवली. यासाठी त्यावेळी पुणे शहरात गाजत असलेला 'सत्यं शिवं सुंदरम्' हा हिंदी सिनेमा एक निमित्त म्हणून घेतला. हे निमित्त स्विकारण्याचे कारण एकच की यायोगे समाजाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले जावे आणि सरास्सपणे स्त्रीच्या होणाऱ्या अप्रतिष्ठेचा समाजाने गंभीरपणे विचार करावा.

## प्रतिक्रीया

मोर्चानंतरही उलट सुलट प्रतिक्रीयांचा मारा सुरूच होता. रोजच्या वर्तमानपत्रात वाचकांच्या पत्रव्यवहारात बरेचजण आपली मते मांडीत होते. काहीजण स्त्रियांच्या इतर प्रश्नावर आवाज उठवा असा सल्ला देत होते. सगळ्याच प्रतिक्रीयांचे आम्ही स्वागत केले. प्रश्न उपस्थित केल्यानंतर लोक साधक बाधक विचार करायला, चर्चा करायला तयार होतात हीच आमच्या दृष्टीने जमेची बाजू.

स्त्रीचे समाजमान्य दुय्यम स्थान पुरुषांना मान्य असेल यात नवल नाही. परंतु स्त्रियांनाही अजाणतेपणे ते मान्य आहे. आणि म्हणूनच सर्वांनी विशेषतः स्त्रियांनी अशा प्रश्नावर जाणीवपूर्वक विचार करावा, स्त्री ही व्यक्ती म्हणून नष्ट होऊन तिचा वापर केला जातो इकडे लक्ष वेधावे हाच आमचा हेतू होता, आहे. अर्थात स्त्री मुक्तीच्या कल्पनेची, विचाराची नीटशी उमजही नसणाऱ्यांना हे पचविणे तसं कठीण आहे. आपल्या मार्गातले हे अडथळे लक्षात घेऊन, ते दूर करूनच आपल्याला पुढे जावे लागणार आहे. या प्रक्रियेतीलच आमचा हा एक प्रयत्न. आणि हा असाच प्रभावीपणे पुढे नेला जाईल असा विश्वास वाटतो. पण त्यासाठी आपण स्त्रियांनीच संघटित होऊन पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**– विपुल मेहता,**
सदस्य, पुरोगामी स्त्री संघटना, पुणे

---

## हरिजनांवरील अत्याचारांचे स्वरुप

नाशिक : हरिजनांवर जातीवाचन शब्द वापरुन शिवीगाळ केली आणि नागरीक हक्क संरक्षण कायद्याचा भंग केला, या आरोपावरून गेल्या सव्वा वर्षात नाशिक जिल्ह्यात एकूण ५४ गुन्हे दाखल झाले. बहुतेक प्रकरणात शिवीगाळ, जातीवाचक शब्द वापरून अपमान करणे व मारहाण झालेली आहे.

सकाळ, २१।४।१९७८

## सती जाण्याचा प्रयत्न

मणिपुरी : मृत पतीच्या चितेवर त्याच्याबरोबरच सती जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेस पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून वाचविले. हा प्रकार मणिपुरी जिल्ह्यातील मुराना येथे घडला.

पोलिसांनी ही कारवाई केल्याने या वेळी उपस्थित असलेल्या जमावातील काही लोक चिडले व त्यांनी पोलिसांवर दगडफेक केली.

केसरी, २२।४।७८